MHOS130010352021

नि.दि.दा.क्र.४७९/२०२१
भिकाजी महानवर व इतर
विरुध्द अनिल गिरी व इतर

## निशाणी क्र.१५ च्या अर्जावरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांच्या विरुध्द दावा 'विना कैफियत' चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.४ यांचे कथनानुसार, प्रस्तुतचा दावा तडजोडीने मिटवण्यासाठी गावातील लोक मध्यस्थी करत होते. सबब, सदर दाव्यामध्ये प्रतिवादींना दाव्यामध्ये तडजोड होण्याची अपेक्षा होती. परंतु, तसे काही झाले नाही व त्यानंतर प्रतिवादी क्र.४ हया अत्यंत वयोवृध्द असुन त्या सतत आजारी असल्याने कैफियत वेळेत दाखल करता आली नाही. परंतु, सदर प्रतिवादी आज रोजी न्यायालयात लेखी कैफियत दाखल करण्यास तयार आहेत. प्रतिवादी क्र.४ यांच्या विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करुन कैफियत स्वीकारणे योग्य व न्याय्य आहे. सदर प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर न आल्यास त्यांचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.४ यांनी 'विना कैफियत' आदेश रद्द होण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रतिवादी क्र.४ च्या अर्जास जोरदार आक्षेप नोंदवला आहे. वादीच्या कथनानुसार, सदर अर्जातील नमुद कारणे खोटी आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज सदर प्रतिवादीवर रक्कम रुपये १,०००/– इतका दंड बसवण्याची विनंती केली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण हे वादीने निरंतर मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादी क्र.४ यांचे दोघांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन दावा गुणदोषांवर निकाली करणे न्यायोचीत ठरते. प्रतिवादी क्र.४ हया वयोवृध्द असुन सतत आजारी असल्या कारणाने त्यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला हे कारण योग्य व संयुक्तीक आहे. सदर प्रतिवादीस कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास निश्चीतच दावा गुणदोषावर निर्णीत करणे सोयीचे ठरते. त्याचवेळी प्रतिवादी क्र.४ यास कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचा विचार करता सदर प्रतिवादीवर रक्कम रुपये ३००/– दंड बसवून अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.१५** वादीस ३००/– रुपये देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.४ यांचे विरुध्दचा 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यांत येतो व त्यांचे 'लेखी म्हणणे' स्वीकारण्यांत येते.

स्वाक्षरीत/–

दिनांक : ०७.०२.२०२४

( **श्रीमती एस.जे. पाटील** )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भूम.